=-=

प्रकरण चौथे

काव्यविषयक नवी जाणीव: म.मो. कुंटे

=-=

प्रास्ताविक:

एकोणिसावे शतक म्हणजे नव्या जुन्यांचा संधिकाल म्हटला पाहिजे. जुन्या कवितेचे प्रवाह जसे वाहत होते, तसे नव्या कविता लेखनाची पूर्व तयारीही या काळात सुरु झाली होती. या दृष्टीने प्रयत्न करणाऱ्यांपैकी महादेव मोरेश्वर कुंटे हे एक होत. त्यांनी इंग्रजीतील (Heroic Epic) वीररस प्रधान काव्य मराठीत नवीनच निर्माण केले. "राजा शिवाजी" या काव्याला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना म्हणजे मराठीतील काव्यविषयक नव्या जाणिवेचे प्रसादचिन्हच होय. पंडिती वळणाची कविता वृत्तमात्रात जखडलेली आणि संस्कृत प्रचुर असल्याने सर्वसामान्यांपर्यंत पोहचत नव्हती. तेव्हा काव्य हे लोक-समुदायाच्या उत्कर्षासाठी आहे, असे मानून काव्याची भाषा सर्वांना समजेल अशी असावी, असा विचार मांडणारे कुंटे हे पहिले कवी होत. अशा या नवविचार प्रवर्तक म.मो. कुंटे यांच्या स्थूल जीवन परिचयाकडे वळू या.

स्थूल जीवन परिचय:

काव्य हे जनसमुदायाच्या उत्कर्षासाठी आहे, असे मानून काव्याची भाषा सर्वांना समजेल अशी असावी असा विचार मांडणारे म.मो. कुंटे हे पहिले कवी होत. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १८३५ रोजी सातारा जिल्हयातील कृष्णाकाठावर वसलेल्या माहुली या गावी झाला. वडिलांचे छत्र बालपणीच हरपले होते. पुढे सन १८४७ मध्ये पुढील शिक्षणाकरता ते कोल्हापूरला आले. व तेथे वार लावून माधुकरी मागून शिक्षण घेतले. पांडोबातात्या दिवेकर यांच्या मराठी शाळेत तीन वर्षात अभ्यास पूर्ण करुन इ.स. १८५० मध्ये ते इंग्रजी शाळेत गेले. न्यायमूर्ती रानडे, रावसाहेब विठ्ठल नारायण पाठक व रावबहादूर बाबाजीराव सावंत हे त्यांचे सहाध्यायी होते. विशेष म्हणजे हे तिघेही शिकण्यासारखी परिस्थिती नसताना मुंबईला गेले. १८५९ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास झाले.

उच्चशिक्षण:

डॉ. विल्सन यांच्या मेहेरबानीमुळे कुंटयांना स्कॉलरशिप मिळाली होती. त्यामुळे उच्च शिक्षणाची सोय झाली. अशा प्रकारे दारिद्रयाशी झगडत बी.ए. पास झाले. यावरुन त्यांच्या विध्दवत्तेची साक्ष पटते. बी.ए. होताच सिंधमध्ये कराची हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून नेमणूक झाली व नवीन आयुष्यास प्रारंभ झाला. सिंधी भाषेचा अभ्यास केला. ते सिंधी भाषेतून व्याख्याने ही देऊ लागले होते. हे त्यांचे नैपुण्य पाहून मुंबई युनिव्हर्सिटीने त्यांना कित्येक वर्षे सिंधी भाषेचे परीक्षक म्हणून नेमले व नंतर कोल्हापूर राजाराम हायस्कूलमध्ये बदली झाली. हेडमास्तर म्हणून सुमारे बारा वर्षांपूर्वी ज्या कोल्हापूरमध्ये कुंटे शिक्षणासाठी वार लावून माधुकरी मागून शिकले. शिवाय उनाड व टारगट म्हणून ओळखले जात होते. त्याच

ठिकाणी हेडमास्तर म्हणून येणे म्हणजे त्यांचे पूर्वचरित्र विसरून त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना मान देणे हा विलक्षण योगायोग म्हटला पाहिजे.

कौटुंबिक जीवन:

कुंटे जरी शिस्तप्रिय व कडक असले तरी अंत:करणाने हळवे होते. वरून टणक असणाऱ्या पण आत गोड पाणी असणाऱ्या नारळासारखे.कुंट्याचे आपल्या मुलींवर फार प्रेम होते. मुली सासरी गेल्यानंतर त्यांना खूप वाईट वाटले. या संदर्भात घारपुरे लिहितात,

"बापा हो बापा । फार लेकी म्हणू नका,
चिमण्यांचा ताफा । उडूनि गेला" ।। १ ।।

एकदा या गाण्याच्या ओळी ते आपल्या ओसरीवरील झोपाळ्यावर बसून गुणगुणत असताना एक इंग्रज माणूस त्यांना भेटण्यासाठी आला होता. त्याने विचारले, तुम्ही हे काय म्हणता ? त्यावर ताबडतोब कुंट्यांनी वरील चार ओळी इंग्रजीत करून सांगितल्या --

"Oh, Papa don't say, Many
Many are they
Like a Pook of Sparrou.
They will fly away"

यावरून कुंटे यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व दिसून येते. जीवनात जे जे नवीन दिसले ते ते कुंटे यांनी मिळविण्याचा प्रयत्न केला. अठरा विश्वे दारिद्र्यात जन्माला येऊन देखील कुंटे यांनी कष्टाची तयारी ठेवून माधुकरी मागून शिक्षण घेतले. स्वत:चे "विविधांगी" व्यक्तिमत्त्व घडविले. अनेक

भाषांचे ज्ञान मिळविले. यावरून त्यांच्याकडे जिद्द, चिकाटी, जिज्ञासा, इच्छापूर्ती असे कांही विशेष गुण दिसून येतात आणि कुंटयांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे दारिद्र्याच्या चिखलात फुललेल्या एका सुंदर कमळाप्रमाणे आहे. शिस्त अभ्यासू, व्यासंगी, विद्वत्व, सहृदय, भाषाप्रभुत्व अशा अनेक पाकळयांनी ते युक्त आहे.

दि. ८ आक्टोबर १८८८ रोजी कुंटे यांचे पक्षाघाताने निधन झाले.

वाङ्‌मय निर्मिती:

कुंटे यांच्या वाङ्‌मयीन व सार्वजनिक कार्याला खरी सुरूवात कोल्हापुरातच झाली. संस्कृत भाषेचा अधिक अभ्यास करून अलंकारशास्त्र, न्यायशास्त्र व व्याकरण या विषयात त्यांनी प्रावीण्य मिळविले. इ.स. १८७० मध्ये कै. राजाराम महाराज छत्रपती यांच्या मृत्युविलापाचे एक काव्य मराठीत केले. तरूण राजपुत्राचा अंत अचानक व्हावा ही गोष्ट लोकांच्या जिवाला लागून राहिली होती. त्यामुळे कुंटे यांनी महाराजाच्या मृत्यूनंतर आठ-दहा दिवसाच्या आतच त्यांनी ते लिहून प्रसिध्द केले. पुढे राजाराम महाराजांच्या नावाने राजाराम हायस्कूल कोल्हापूरात स्थापन झाले व त्यानंतर राजाराम कॉलेजही निघाले.

"राजा शिवाजी" ह्या काव्याचे पहिले तीन भाग त्यांनी राजाराम हायस्कूलमध्ये हेडमास्तर असतानाच लिहिले होते व नंतरचे तीन भाग पूना हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून नेमणूक झाल्यानंतर लिहिले "राजा शिवाजी" या काव्याला जोडलेली इंग्रजी प्रस्तावना व त्यातून प्रकट होणारे काव्यविचार विसाव्या शतकातील मराठी काव्यरचनेस नवीन वळण देण्याच्या हेतूने मांडलेले विचार आहेत. त्यामुळे कुंटयांना स्वतंत्र कवी म्हणून लोकप्रियता मिळाली.

त्यांचे हे काव्य सहा भागांत असून अपूर्ण आहे. कुंट्यांना ते बारा भागात लिहावयाचे होते.

याशिवाय मानसशास्त्रीय पातळीवर मनाचे वर्णन करणारे "मन" नावाचे काव्य कुंटे यांनी लिहिले. आधुनिक मराठी काव्यातला हा प्रयत्न प्रशंसनीय वाटतो. कुंट्यांना मनस्वीपणे वागण्याची फार हौस होती. याची येथे प्रचीती येते. "ऋषी" हे काव्य कुंट्यांनी इंग्रजीमध्ये लिहिले. इ.स. १८७० ते १८७१ या दोन वर्षांत अनुक्रमे दि रिफॉर्म क्वेश्चन नं. १ व २ अशी दोन पुस्तके प्रसिध्द केली. दि रिफॉर्म क्वेश्चन नं. १ मध्ये कुंट्यांनी सामाजिक सुधारणा या विषयाबद्दल विवेचन केले आहे. तर दि रिफॉर्म क्वेश्चन नं.२ मध्ये राजकीय सुधारणांसंबंधी विवेचन केले आहे.

"भारतीय आर्य संस्कृतीची स्थित्यंतरे" या नावाचे एक मोठे पुस्तक कुंट्यांनी लिहिले. त्याबद्दल त्यांना पारितोषिक ही मिळाले होते. या इंग्रजी पुस्तकात इ. सन १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात जो मोठा दुष्काळ पडला होता त्याचे वर्णन केलेले आहे. इंडियन डायलेक्टिक्स, लेक्चर ऑन सिलोन इ. छोटे निबंध ही कुंट्यांनी लिहिलेली आहेत.

व्यासंगी व शिस्तप्रिय व्यक्तित्त्व:

अशाप्रकारे त्यांनी पुण्यामध्ये असताना वाङ्मयसेवा चांगल्याप्रकारे केली. त्यांच्या स्वभावधर्माप्रमाणे कुंटे गप्प न बसता शास्त्राभ्यास वाढला व विचारात फरक पडून ते भक्तिमार्गाकडे वळलेले भजनात रमू लागले. कुंटे पूना हायस्कूलचे हेडमास्तर झाले . असा मान एका एतद्देशीय माणसाला कुंट्यांच्या रूपाने प्रथमच मिळाला होता. तो ही न मागता. कारण त्यावेळी पूना हायस्कूलचे

हेडमास्तर हे कोणीतरी ब्रिटिश अधिकारी असत. पण कुंटयांच्या विद्वत्ते-मुळे व शिस्तप्रियतेमुळे ही संधी त्यांना लाभली. तसेच दोन वर्षे मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक व अहमदाबाद कॉलेजचे प्राचार्य म्हणून कुंटयांनी काम केले.

कुंटे यांनी सार्वजनिक कार्यातही रस घेतला होता. तसेच शिसवी पेन्सिलीचा कारखाना काढून उद्योग व्यवसायही केला. तसेच कुंटयांनी संगी-ताचा ही अभ्यास केला होता. एकदा वर्तमानपत्रात भारतीय संगीतावर चर्चा झाली. व त्याबद्दल असे लिहिले होते की, भारतीय संगीत परिपूर्ण नाही. हे मत कुंटयांना पटले नाही. त्यासाठी त्यांनी भारतीय संगीताचा अभ्यास केला आणि **" Hindu Music and the Gayan Samaj."** हा लेख इंग्रजीत ले लिहिला. त्यामध्ये त्यांनी भारतीय संगीताची तारीफ केली आहे. या वरून कुंटयांच्या अभ्यासू वृत्तीची व व्यासंगाची साक्ष पटते.

कुंटयांनी अनेक भाषांचे ज्ञान संपादन केले होते. जे जे चांगले दिसेल ते ते त्यांनी टिपले आहे. अहमदाबादला त्यांची संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. तेव्हा तिथे ते गुजराथी भाषा शिकले व त्या भाषेतून व्याख्यानेही दिली. सिंधी भाषेतूनही व्याख्याने दिली आहेत. त्याशिवाय संस्कृत, ग्रीक, लॅटिन व फार्सी इ. भाषांही त्यांना चांगल्या अवगत होत्या. रा.भि. गुंजीकरांप्रमाणेच कुंटयांनी देखील अनेक भाषा अवगत केल्या आहेत. एवढेच नव्हे, तर त्या चांगल्याच आत्मसात केल्या आहेत. असे हे भाषाप्रभू विद्वान होते पण कधी कधी ते लहरीपणे वागत. त्यांच्या विक्षिप्त वागण्यामुळे त्यांचा म्हणावा तसा लौकिक झाला नाही. त्यांच्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वामधील ही एक उणीव म्हटली पाहिजे. अपूर्णता ही मानवी सृष्टीचा नियम आहे." हे आपणास ज्ञात आहेच.

कुंटे हायस्कूलमध्ये आपले काम नेहमी चोख करीत व इतरांकडून ते तसेच शिस्तबध्द व चोख करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. कोणालाही कामाच्या बाबतीत दयामाया न दाखवता वेळ पडली तर ते शासनही करीत. त्यामुळे कुंटे म्हणजे दुसरा जमदग्नीच वाटत. त्याकाळात पूना हायस्कूल म्हणजे एक आदर्श शाळा होती. त्याशिवाय ब्रिटिश काळ आणि त्यात कुंटेही फार कडक व शिस्तप्रिय. त्याचे वर्णन करताना डॉ. घारपुरे लिहितात, "पायात बूट, वर काळ्या रंगाची पाटलोण, काळा लॉंग कोट, डोक्यावर तांबड्या रंगाची कंदी, लहान पागोटे, अंगावर साधे किंवा कधी कधी जरीकाठी उपरणे, हातात सोटा व खिशात घड्याळ व त्यांचा स्वभाव मनमोकळा असून विद्यार्थ्यांवर त्यांचे फार प्रेम होते."[१]

कुंटे याचा काव्यविचार:

"राजा शिवाजी"स (इ.स. १८७१) कुंटे यांनी लिहिलेली प्रस्तावना अत्यंत महत्त्वाची आहे. कुंटे यांनी ही दीर्घ प्रस्तावना लिहून काव्यविषयक स्वतंत्र असे विचार मांडलेले आहेत. अर्वाचीन मराठी काव्यविचारात या प्रस्तावनेला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. एकोणिसाव्या शतकात त्यांनी इंग्रजी धर्तीचे काव्यविषयक विचार मांडलेले आहेत. तत्कालीन रूढ असणाऱ्या काव्यविषयक मतांना फाटा देणारी अशीच ती प्रस्तावना आहे. त्यांनी आपले विचार मांडताना प्रत्येक मुद्दयाला स्वतंत्र शीर्षके दिलेली आहेत. तत्कालीन परिस्थितीमध्ये कुंटयांची काव्यविषयक भूमिका नवी असल्यामुळे ती सुशिक्षित लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. म्हणून कदाचित कुंटयांनी ही प्रस्तावना

इंग्रजीत लिहिली असावी. परंतु यामुळे तर त्याचे काव्यविषयक विचार सर्व थरांतील लोकांना समजण्यास मर्यादा पडल्या आहेत. "ही प्रस्तावना इंग्रजीत असल्यामुळे ती भाषा न जाणणाऱ्या लोकांना तिच्यापासून काडीचाही उपयोग होत नाही."[२] असे श्री. गुजीकर यांनी म्हटले असले तरी प्रस्तावनेचा आशय लक्षात घेता मराठी कवितेला नवी दिशा दाखविण्याच्या दृष्टीने तिचे महत्त्व नाकारता येत नाही.

आता कुंट्यांच्या प्रस्तावनेतील काव्यविषयक विचारांकडे वळू या. कुंट्यांनी आपल्या दीर्घ इंग्रजी प्रस्तावनेमध्ये खालील नऊ मुद्दयांचे विवेचन केलेले आहे. त्या प्रत्येक मुद्दयास त्यांनी शीर्षक ही दिलेले आहे. यातून त्यांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट होते.

1) **The definition of a poem and the circumstances under which it is applied.**

(कवितेची व्याख्या व ती ज्या परिस्थितीत लागू पडते ती परिस्थिती)

कविता ही भावनांना हेलावून सोडणारी असते. हा कुंट्यांनी मांडलेला विचार त्याकाळी लिहिल्या जाणाऱ्या कवितेच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचा असाच आहे. कुंट्यांनी सुबोध, सोपी अशी काव्याची व्याख्या केली आहे. ते म्हणतात, " **Poetry, in the largest sense given to it, is that, which charms the feelings without offending the understanding".**[३]

"आपल्या आकलन शक्तीला बाधा न येऊ देता भावनांना जी हलवून जाते ती कविता." पण कोणत्याही काव्याचे यश हे वाचकाची अभिरुची व भावना यावर अवलंबून असते. असे कुंटे म्हणतात. हे मत त्यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे व्यक्त होते.

"It is essential for every poem to conform to this detirution, and fultil all the conditions it embodies. But its success depends upon the taste and feelings for its readers."[४]

कोणतीही कविता वरील व्याख्येशी मिळती जुळती असावी, व या काव्याच्या अंतर्गत अटी प्रत्येक काव्यात असाव्यात असे कुंटे यांना वाटते. कवितेचे यशापयश हे वाचकाची भावना व अभिरुची यावरच आधारलेले असते. अभिरुची ही व्यक्तिपरत्वे राष्ट्रपरत्वे बदलणारी, प्रसंगी निर्मळ, दूषित किंवा चिकित्सकही असू शकते.

2) The taste of the Marathas.

[मराठी भाषिक लोकांची वाङ्:मयीन अभिरुची]

मराठी भाषिक लोकांच्या काव्यविषयक आवडीनिवडी लक्षात घेऊन व तत्कालीन वास्तवाचे भान देऊन तीन प्रकारची वर्गवारी कुंटे यांनी केलेली आहे, ती पुढील प्रमाणे :

अ] शास्त्रीमंडळी आणि त्यांचे अनुयायी हा सर्वात मोठा वर्ग.
ब] सुशिक्षित म्हणजे इंग्रजी समजणारा लोकांचा वर्ग.
क] अशिक्षित वर्ग.

अ] शास्त्री लोकांचे हे संपूर्ण साहित्य इतके दैदिप्यमान आहे, परंतु ते स्वाभाविक वाटत नाही. कुंटयांच्याच भाषेत सांगावयाचे तर, हे लोक काव्यातील विचारांपेक्षा भपकेबाज अलंकारिकता व छंदोबध्द रचनेला महत्त्व देतात. म्हणून कुंटयांना या शास्त्री वर्गाकडून फारशा अपेक्षा नाहीत.

ब) सुशिक्षित म्हणजे इंग्रजी समजणारा वर्ग: इंग्रजी वाङ्‌मयाच्या अभ्यासामुळे तो आपल्या मातृभाषेला नाके मुरडतो. कारण इंग्रजी वाचनाची त्याला सवय असते त्यामुळे इंग्रजी कवितेतील सौंदर्य ते जाणू शकतात व त्यातील रसप्रतीती ही त्यांना होऊ शकते. पण मराठी भाषेतील काव्य त्यांना वाचावेसे वाटत नाही. मराठी ही त्यांची मातृभाषा असली तरीसुद्दा त्यांना ती वेगळी वाटते. शास्त्री मंडळींना शुद्द मराठी काव्य कर्णकटू वाटते. एकूण शास्त्री लोकांचा वर्ग या मराठी काव्याकडे संस्कृतच्या भूमिकेतून तर सुशिक्षित वर्ग इंग्रजीच्या भूमिकेतून पाहत असतो. संस्कृतधार्जिण्या सुशिक्षितांवर कुंटयांचा विशेष कटाक्ष आहे. कारण मराठी शब्द काव्यात वापरल्याने जणू काव्यसौंदर्य नष्ट होते, असा एक त्यांचा चुकीचा समज आहे, असे कुंटे म्हणतात. अशा प्रकारचा गैरसमज सर्वसामान्य मराठी वाचकांमध्ये दिसत नाही. म्हणूनच कुंटयांना मराठमोळा वाचकच खरा वाचक वाटतो आहे व त्याला समजेल असे काव्य लिहिले जावे, अशी कुंटे यांची अपेक्षा आहे.

क) यामध्ये अशिक्षित वर्ग म्हणजे शेतकरी, श्रमजीवी वर्गाचा बाबतीत प्रश्न निर्माण होत नाही. परंतु महाराष्ट्रातील अशिक्षित जनतेला स्वत:ची अस्मिता आहे. मुसलमान सत्तेविरुद्द ज्यांनी आवाज उठविला आणि राजकीय, क्रांतीमधून व धार्मिक संक्रमणातून त्यांनी आपल्या भावना, अभिरुची शिल्लक ठेवलेली आहे. तेव्हा हाच मराठमोळा वाचक खरा मराठी कवितेचा आस्वादक आहे, आणि याच वाचकापर्यंत मराठी कविता जावयाची असल्यास त्यांच्या नेहमीच्या व्यवहाराच्या भाषेत काव्य लिहायला पाहिजे. कुंटयांनी या काळात केलेला हा एक धाडसी प्रयोगच वाटतो. तो समाज रुढीप्रिय असला तरी त्याच्या मनाला

कळण देणे शक्य आहे. तुकारामाने ह्याच वर्गात आस्तिक्यबुध्दीचे समर्थन व मुक्तीसाठी आवश्यक असणारी चित्तशुध्दी ही दोन तत्त्वे मांडलेली दिसून येतात. या वर्गावर कुंटेयांचा विश्वास आहे. म्हणूनच त्यांनी "राजा शिवाजी" या काव्यात सर्व सामान्य लोकांच्या बोली भाषेवाच उपयोग केला आहे. हा काव्यविषयक नवा विचार कुंटे यांनी मांडला. एवढेच नाही, तर त्यानुसार काव्यलेखन करण्याचा धाडसी प्रयोगदेखील केला.

३) **The school of science and the schools of Literature.**

(विज्ञानविचार आणि साहित्यविचार)

विज्ञान व साहित्य यात परस्पर विरोध नाही, मानवी सुखाची अभिवृध्दी करण्यास विज्ञान व साहित्य ही दोन उपयुक्त साधने आहेत. या दोहोंच्या विकास वाढीतूनच संस्कृतीची जडणघडण होते, असे कुंटे मानतात.

"एखाद्या समाजाच्या संपूर्ण आणि सर्वांगीण विभागाच्या दृष्टीने शास्त्रीय प्रगतीइतकेच वाङ्‌मयातील प्रगतीलाही महत्त्व आहे. असा विचार मांडून कुंटे एके ठिकाणी म्हणतात, की आपण सध्या ज्या स्थितीत आहोत त्या स्थितीच्या दृष्टीने खऱ्याखुऱ्या पदार्थविज्ञानशास्त्राचा एक नवा संप्रदाय जन्माला येण्यासाठी जितके महत्त्व आहे, तितकेच नव्या कवींचा एखादा अभिनव संप्रदाय जन्माला येण्यास महत्त्व आहे. गणित, रसायन, वैधक इत्यादी शास्त्रांत आपण इंग्लंडच्या मागे आहोत पण त्यात घाबरण्यासारखे काही नाही कुंटे म्हणतात आपण त्याही क्षेत्रात इंग्लंडच्या पुढे जाऊ. काव्याच्या क्षेत्रातदेखील आपण प्रगती पथावर जाऊ हा त्यांचा आशावाद फार मोलाचा आहे. यादृष्टीने विचार करून आपल्या देशात गणितज्ज्ञ, रसायनशास्त्र यांच्याबरोबरीनेच काव्याच्या नवसंप्रदायाच्या प्रवर्तकांनाही

आपण उत्तेजन दिले पाहिजे. हा वाङ्‌मयदृष्टया अत्यंत पुढारलेला विचार ते मांडतात."[१५]

४) **The great Gulf** (रूंद दरी)

किंवा दोन वर्गातील दुरावा असेही म्हणता येईल. खालचा वर्ग आणि वरचा वर्ग यात सर्वसाधारणपणे समाज विभागलेला असतो. शास्त्रज्ञ, तत्वज्ञ किंवा लिहिणारे संख्येने थोडेच असतात. त्यांनी केलेले लेखन अशिक्षित लोकांकडून वाचले जातेच असे नाही. त्यापुढे या दोन वर्गात एक प्रकारचे अंतर निर्माण झालेले आहे. ते दोन्ही वर्ग परस्परांपासून तुटल्यासारखे होतात. या प्रकारची दरी निर्माण झाली की, धार्मिक, सामाजिक व राजकीय अवनीती ही ठरलेली असते. उच्च आणि कनिष्ठ वर्गातील ही रूंद दरी कमी करण्याचा एकमेव मार्ग आहे. तो म्हणजे उच्चविचार लोकप्रिय करणारे, समाजाचा सहभावनेच्या विकासाला उत्तेजन देणारे, आणि वरच्या श्रीमंत वर्गाला मानवतावादी बनविणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे. हा वाङ्‌मयविषयक दृष्टीतून मांडलेला विचार आजही विचारार्ह वाटतो.

५) **Negative Criticism.** (नकारात्मक टीका)

टीका लेखनाची भूमिका विधायक असली पाहिजे, असे कुंटे सांगतात. नकारात्मक टीका ही अज्ञानमूलक व पोकळ असते याप्रकारची टीका लेखकांवर वाईट परिणाम करणारी, अस्वस्थ करणारी, असते. नकारात्मक टीका ही मुळातच विध्वंसक स्वरूपाची असते. त्यामुळे विधायक टीका ही महत्त्वाची ठरते. नकारात्मक टीका करणेस विद्वत्तेची फारशी गरज नसते. मात्र विधायक टीका करणारा तितकाच व्यासंगी असावा लागतो.

६) **An epic what?** (महाकाव्य म्हणजे काय ?)

कुंटयांनी महाकाव्यासंबंधी नवा विचार त्या काळात मांडला. त्याकाळात मांडलेला हा विचार आजदेखील मोलाचा ठरलेला आहे. त्यांनी महाकाव्याचे सांगितलेले घटक पुढीलप्रमाणे --

अ) महाकाव्य हे भावकाव्य, शोकांतिका सुखांतिका इत्यादीपासून निराळे असते. हे साहित्यिक प्रकार बहुतेक एका व्यक्तिच्या जीवनाशी निगडीत असतात. त्यामध्ये संपूर्ण राष्ट्राचा उगम, विकास व लय दाखविलेला असतो. सर्व निसर्गदृश्यांचे वर्णन त्यामध्ये असते. महाकाव्यामुळे मानवी भावनांचा विचारांचा विकास होतो. कित्येक वेळा एखादे महाकाव्य वीररसप्रधान असून त्यातील सर्व घटना नायकाभोवती केंद्रित झाल्या आहेत, असे वाटते. पण तो भास आहे. सारे राष्ट्रच काव्य नायकपदी स्थानापन्न झालेले असते. तेव्हा अशा वर्णनाची एखादी कविता नाटकाच्या नियमाने तपासली गेली तर ती असमाधानकारक ठरेल. परंतु अशी टीका करणे चमत्कारिक ठरेल.

याशिवाय कुंटयांनी लेखकाची महत्त्वाकांक्षा व त्या पुढील मुद्यामध्ये महाकाव्याच्या कथावस्तूसंबंधी व कथानिर्मिती संबंधी दोन मुद्दे मांडले आहेत ते असे --

महाकाव्याची कथावस्तू कवीला इतिहासग्रंथात मिळत नाही. जर शिवाजीवर महाकाव्य लिहावयाचे असेल तर त्यासाठी एल्फिन्स्टनच्या इतिहासग्रंथाकडे वळून चालणार नाही. त्यासाठी रामदास, तुकाराम यांच्या साहित्याकडे वळावे लागेल.

महाकवी हा इतिवृत्तकार असत नाही. इतिहासापेक्षा त्यामधील कथानिर्मिती व कथारचना यांना महाकाव्यात अधिक महत्त्व असते असे कुंटे यांनी म्हटले आहे.

७) **The ambition of the author.**

(लेखकाची महत्त्वाकांक्षा)

शिवकाळामध्ये जागृत झालेल्या भावभावना या काव्यामध्ये दाखविण्याची कुंटे यांची प्रबळ महत्त्वाकांक्षा दिसते. मराठ्यांची देवालये नष्ट केली जात होती. त्यांच्या धार्मिक भावना दुखाविल्या जात होत्या. त्यांचे पुढारी निर्दयपणे ठार केले गेले, त्यामुळे मराठे मुसलमानांच्या अन्यायामुळे चवताळून उठले. असे हे त्रासलेले मराठे सशस्त्र बनून उत्स्फूर्तपणे एकाचवेळी मोगलांच्या विरुद्ध उठले. त्यावेळी त्यांच्यापुढे राजकीय ध्येय नव्हते, तर जुलमी मोगलांविरुद्ध सूड उगवण्याशिवाय त्यांच्यापुढे कोणतीच महत्त्वाकांक्षा नव्हती. मोगलांना हकलून लावणे हाच आपला धर्म वा जीवनकार्य आहे.अशाप्रकारे महाराष्ट्राच्या सुदैवाला धार्मिक व राजकीय कारणे कार्यान्वित झाली. कुंटे पुढे म्हणतात, "शिवाजीचे चरित्र हे एल्फिन्स्टनच्या इतिहासावरून किंवा मरेच्या ब्रिटिश इंडिया या इंग्रजांनी लिहिलेल्या इतिहासावरून शिकण्यासारखे नाही. तसेच तत्कालीन परिस्थितीचा नेमका बोधही यावरून करता येण्यासारखा नाही."[६] आणि यातूनच एकप्रकारे "राजा शिवाजी"तील आपल्या विचारांचे समर्थन केले आहे.

८) **Style** (शैली)

कुंट्यांनी प्रस्तावनेच्या नवव्या परिच्छेदात शैलीबद्दल विवेचन केले आहे. ते लिहितात की त्यावेळी स्वच्छंदतावादी आणि अभिजात ह्या दोन शैली मान्यता पावलेल्या होत्या. या लेखनपध्दतीचा उगम निसर्गात असावा. कुंट्यांच्या मते खरी कला ही निसर्गाचे अनुकरण करते. पण ज्यावेळी नैसर्गिकता सोडून काही विशिष्ट परिणाम करण्याचा ती प्रयत्न करते तेव्हा तिला कला म्हणता येत नाही. अशा प्रकारच्या कलावर्णनांतून जी शैली निघाली आहे तिला कृत्रीम

शैली म्हणतात. ही अभिजात शैलीशी मिळतीजुळती आहे म्हणून त्यालाच अभिजात शैली म्हटले आहे. आणि निसर्गाशी जवळीक साधणारी जी पध्दती ती स्वच्छंदतावादी शैली होय. हा फरक मराठी व संस्कृत लिखाणामध्ये दिसून येतो. रामायण, महाभारत इत्यादी जुनी महाकाव्ये, कालिदासाच्या कृती ह्या अभिजात शैलीमध्ये येतात. तसेच तुकाराम, रामदासांचे काव्य याच प्रकारात येते. परंतु संस्कृतमधील पंचमहाकाव्ये, चंपूकाव्ये तसेच मोरोपंताच्या आर्या ह्या दुस-या वर्गात मोडतात. या दोन्ही शैलीतील फरकाला कुंटे महत्त्व देतात. आणि हे शास्त्री लोक पंचमहाकाव्य किंवा चंपूकाव्याशिवाय दुस-या कोणत्याही काव्याला मान्यता देत नाहीत. आपल्या समाजातील सुशिक्षितांच्या अभिरूचीबद्दल अंदाज बांधणे कठीण आहे. कारण ते मिल्ल, शेक्सपियर यांच्या वाङ्मयीन व शास्त्रीय वातावरणात जगत असतात. त्यामुळे ते चांगले समीक्षक बनले आहेत. परंतु पुण्याच्या विद्वानांनी जी काही भाषांतरे केलेली आहेत त्यावरून काव्याचा विचार केला असता अभिजात लेखन शैलीच त्यांना जवळची होती असे दिसते.

नैसर्गिक मराठीमध्ये किंवा सर्वसामान्यांच्या भाषेत जर का कुणी एखाद्याने कविता लिहिलीच, तर त्याला विरोध आणि उपहास सहन करण्याची त्याने तयारी ठेवली पाहिजे. कारण काव्यामध्ये जेवढे म्हणून संस्कृत शब्द खेचता येतील तेवढे लिहावेत ही प्रचलित कल्पना होती.

भाषेसंबंधीचा नवा विचार:

मराठी शब्दांचा जसा उच्चार करतो तसे ते लिहिले जात नाहीत. जोपर्यंत उच्चारित मराठी शब्द व लिखित मराठी शब्द यातील फरक नष्ट होत नाही तोपर्यंत मराठी छंदरचनेत त्रुटीच राहतील. हा फरक लक्षात घेऊनच

कुंटयांनी आपल्या प्रस्तुत कवितेत शब्द जसे उच्चारले जातात, तसे निर्भयपणे योजले आहेत. अशाप्रकारे कुंटयांनी कवितेमध्ये मराठमोळया भाषेचा वापर करावा हा जो स्वतंत्र विचार मांडला आहे तो किती भविष्यदर्शी आहे याची, कल्पना येते.

९) **The fable, the plot or the story.**
(काव्यातील बोधकारी कहाणी किंवा कथानक)

शेक्टच्या दहाव्या परिच्छेदामध्ये कुंटयांनी कवितेतील संविधानक किंवा कथानक हया महत्त्वाच्या गोष्टीचे विवेचन केलेले आहे. कोणात्याही काव्यामध्ये कथानक महत्त्वाचे असते. कारण ख-या काव्याचे लक्षण म्हणजे नवीनता हे होय. तसेच कथानकाची रचना करणे व मनाला उच्च स्तरावर नेणे हे आहे. कवी म्हणजे इतिहासलेखक नव्हे की ज्याचा उद्योग केवळ कथानक लिहिणे, कवी निसर्गामध्ये जे जे पाहतो किंवा मानवी भावनांचे त्याला जे दर्शन घडते माणसाच्या महत्त्वाकांक्षा त्याचा आंतरिक स्वभाव किंवा डोळयाने दिसणा-या प्रत्येक गोष्टी म्हणजे बाहय निसर्ग, नदया, तारे, पर्वत आकाश वगैरे या सर्वांचा उपयोग करून कवी नवी चित्रे निर्माण करतो. म्हणून कथानकाच्या विस्ताराला महत्त्व प्राप्त होते.

समारोप:
======

कुंटे यांनी "राजा शिवाजी"स लिहिलेली प्रस्तावना ही इंग्रजीमध्ये आहे. कुंटयांनी अभिरूचीनुसार वाचकांचे तीन वर्ग केलेले आहेत. त्यातील तिस-या वर्गासाठी म्हणजे अशिक्षित, बहुजन समाजातील लोकांकरिता "राजा शिवाजी" लिहिलेले आहे. काव्य त्यांच्या दैनंदिन जीवनातील व्यवहारातील भाषेतून लिहिले तर ते त्यांच्या पर्यंत पोहचू शकेल, असे म्हणणा-या कुंटयांनी

मात्र आपल्या काव्याची प्रस्तावना इंग्रजीमध्ये दिलेली आहे. काव्याची व्याख्या करताना ते म्हणतात, "आपल्या आकलन शक्तीस कोणत्याही प्रकारचा त्रास न होता ज्यामुळे आपले मन आनंदमय होते ते काव्य होय. काव्य वाङ्‌मय हे लोकांच्या उत्कर्षासाठी आहे. तेव्हा ते सुशिक्षितां-पासून अडाणी लोकांपर्यंत सर्वांस समजेल अशा स्वाभाविक व सोप्या भाषेत हवे." अशी कुंटयांची भूमिका व काव्याचे ध्येय हे मराठी वाचकवर्गास समजणे जरूरीचे असून ही ते आहे त्या स्वरूपात समजले नाही. कारण या अशिक्षित लोकांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नव्हते. तेव्हा इतरांकडून जे ऐकीव स्वरूपात जे काही विचार समजले असतील ते विकृत व भ्रष्ट स्वरूपात, तेव्हा यावरून एक निष्कर्ष निघतो की, कुंटयांनी आपल्या कवितेच्या भूमिकेसाठी, ध्येयासाठी जर ही प्रस्तावना मराठीत लिहिली असती, तर मराठी वाचक फार उपकृत झाले असते. त्यावेळच्या रूढीप्रमाणे इंग्रजी प्रस्तावनेबरोबर मराठी प्रस्तावना ही दिली असती तर कुंटयांचे काव्य विषयक असणारे धोरण यशस्वी झाले असते.

कुंटे यांनी "राजा शिवाजी"च्या प्रस्तावनेमध्ये काव्य स्वरूप, काव्याची भाषा, महाकाव्य शैली या संबंधीचे केलेले विवेचन हे मराठी काव्याच्या इति-हासात प्रथमच आलेले आहे. त्यापूर्वी फक्त गुंजीकरांनी" "मराठी कविता" या नावाचा काव्यविषयक लेख लिहिलेला होता. पण कुंटयांनी आपल्या प्रस्ता-वनेत काव्यविषयी सोदाहरण व विस्ताराने चर्चा केलेली आढळते. संस्कृत लोकांत गद्य व पद्य वाङ्‌मयाची भाषा निरनिराळी मानण्यात येत होती. अशा परिस्थितीमध्ये सर्वसामान्य लोकांसाठी व्यावहारिक भाषेतून काव्य लिहिण्याचे धाडस कुंटे यांनी केले. हे त्यांचे वैशिष्टय होय. अभिरूचीनुसार समाजातील

लोकांचे वर्गीकरण करून या प्रत्येकाची अभिरुची भिन्न भिन्न आढळते. असेही कुंटे नमूद करतात. अर्वाचीन मराठीमध्ये महाकाव्य लेखनाचा कुंटे यांचा पहिलाच प्रयत्न आहे, हे लक्षात घ्यायला हवे.

"राजा शिवाजी"च्या प्रस्तावनेद्वारे कुंटे यांनी मराठी वाचकांना व अभ्यासकांना काव्य विषयक नवी दृष्टी दिली. प्रस्तावनेत मांडलेल्या विचारांना त्यांच्या कवितेत न्याय मिळाला नसला, तरी मराठी कवितेच्या इतिहासात व काव्यविषयक अभ्यासात त्यांचा हा प्रयत्न महत्त्वाचा मानला जावा इतका तोलामोलाचा आहे.

......

संदर्भ

१) डॉ.न.का. घारपुरे, : कुंटे, स्मृती प्रबंध, प्रकाशक न.का. घारपुरे, पुणे २, पृ. ११०.

२) विविधज्ञानविस्तार, : पृ.४, अंक ६, नोव्हें, १८७१, पुस्तक परीक्षा, राजा शिवाजी, पृ.८९.

३) कुंटे म.मो, : "राजाशिवाजी", इंग्रजी प्रस्तावना, दुसरी आवृत्ती, १९२७, प्रकाशक ग.मो. अधिकारी सरस्वती प्रकारक मंडळी,पुणे,पृ.१.

४) तत्रैव, : पृ. १.

५) वा.ल. कुलकर्णी, : "साहित्य शोध आणि बोध" प्रथम आवृत्ती, प्रकाशक ग.रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ३४, पृ. १८७.

६) म.मो. कुंटे, : उनि, पृ. १३.

......